




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १४९ ●शुक्रवार, दि. २९ ऑगस्ट २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# शिवनेरी गडाची माती कपाळी लाऊन...

# सरदार संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील करोडो बांधवासह मुंबईत दाखल





**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलक शुक्रवारी आझाद मैदानावर धडकणार आहेत. या आंदोलनासाठी पोलिसांनी जय्यत तयारी केली असून आझाद मैदान परिसरात दिड हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्यामुळे आझाद मैदानाला पोलीस छावणीचे स्वरूप आले आहे. त्यातच गृहमंत्री अमित शहा देखील शुक्रवारी मुंबईत येणार असल्याने मुंबई पोलिसांची कसोटी पाहणारा ठरणार आहे. मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते जरांगे पाटील यांनी

▶▶ उर्वरित पान २ वर

## ● पोलिसांचा प्रचंड बंदोबस्त

गणेशोत्सवकाळात मुंबई पोलिसांनी २० हजार पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. आता मनोज जरांगे पाटील मुंबईच्या आझाद मैदानात येणार असल्याने तेथे पोलीस छावणीचे स्वरूप आले आहे. आंदोलन स्थळ आझाद मैदान येथे दीड हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्यात २ अतिरिक्त पोलीस आयुक्त, ६ पोलीस उपायुक्त दर्जाचे अधिकारी, २०० सहाय्यक पोलीस आयुक्त आणि पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी आणि १३०० पोलीस कर्मचारी आदींचा समावेश आहे. याशिवाय राज्य राखीव दल, शीघ्र कृती दल, दंगल नियंत्रण पथक, केंद्रीय राखीव दल, बॉम्ब स्क्वॉड पथक तैनात करण्यात आले आहे. लाखोंच्या संख्येने आंदोलन एकत्र येणार असल्याने कुठलेही गालबोट लागू नये यासाठी आम्ही सर्वतोपरी खबरदारी घेत असल्याचे एका वरिष्ठ पोलीस अधिकार्याने सांगितले.

## ● मुंबईत मराठा आंदोलकांच्या गाडीला अपघात, ३ जखमी



मनोज जरांगे यांच्या आवाहनानुसार राज्यभरातून मराठा बांधव मुंबईच्या दिशेने येत आहेत. आपले वाहन घेऊन, पीकअप, चारचाकी गाड्या घेऊन ते मुंबईतील आझाद मैदानाकडे आगेकूच करत आहेत. दरम्यान, एका मराठा बांधवाच्या गाडीचा अपघात झाल्याची घटना घडली. मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मराठा आंदोलकांचा टेम्पो उलटल्याने अपघात झाला असून तीन जण जखमी झाले आहेत. मुंबईतील फ्री वे एक्सप्रेसवरील ही घटना असून आता मुंबईत आंदोलक जमायला सुरुवात झाली आहे. मुंबईतील आझाद मैदानच्या दिशेने निघालेल्या टेम्पोला काही वेळापूर्वी साधारण ६.३० वाजताच्या सुमारास अपघात झाला. अपघातात उद्धव मोहिते, शिवराम पाटील आणि विकास शिंदे हे तीन जण जखमी झाले आहेत. अपघातातील सर्व जखमी सायन रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत केली, त्यानंतर अपघातग्रस्त टेम्पो रस्त्यावरून हटवला आहे. दुसरीकडे मराठा आंदोलकांनी एलिव्हेटेड ईस्टर्न फ्रीवेच्या खाली मिळेल तिथे वाहनं पार्क करायला सुरूवात केल्याचं पाहायला मिळत आहे. त्यामुळे, जरांगे पाटील मुंबईत दाखल होण्यापूर्वीच रात्रीतून आंदोलकांची गर्दी वाढेल असा अंदाज आहे.

# राजधर्माचे पालन करा अन् तातडीने मराठा आरक्षणाची घोषणा करा, दिल्लीतून...; काँग्रेसची सरकारकडे मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**



मराठा समाजाला आरक्षण मिळावं, या मागणीसाठी काल (२७ ऑगस्ट) अंतरवाली सराटी येथून मनोज जरांगे पाटील मुंबईच्या दिशेने रवाना झाले. जरांगे पाटील यांनी आरक्षणावरुन महायुती सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. राज्यभराच्या वेगवेगळ्या ठिकाणावरून मराठा बांधव हे थेट आता मुंबई गाठत असल्याचे चित्र आहे. यावरुन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सरकारकडे मोठी मागणी केली आहे. सरकारने ठरवले तर पाच मिनिटात मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागू शकतो पण सरकार ते करत नाही. भारतीय जनता पक्ष व देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला दिलेले आश्वासन पाळावे. केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार आहे. राज्यात प्रचंड मोठे बहुमत असून त्यांनी दिल्लीत जाऊन आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवावी. राजधर्माचे पालन करत तातडीने

▶▶ उर्वरित पान २ वर

## बालविवाह उघड, सहा जणांवर गुन्हा दाखल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

चतुरवाडी येथे तीन वर्षापूर्वी एका अल्पवयीन मुलीचा विवाह झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी ग्रामविकास अधिकारी बंडु जांभळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून सहा जणांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली. बंडू जांभळे हे ग्रामपंचायत जोगाईवाडी येथे नेमणुकीस असून चतुरवाडीचे कामकाजही तेच पाहतात. त्यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, चतुरवाडी येथील १७ वर्षीय अल्पवयीन हिचा विवाह दिनांक २८ मार्च २०२२ रोजी आमोल मदने (रा. फरदपूर, ता. रेणापूर, जि. लातूर) याच्यासोबत लावण्यात आला.

# पूरसंकटावर मात करण्यासाठी प्रशासन सज्ज ; नागरिकांनी घ्यावी काळजी , सावधगिरी बाळगणे गरजेचे : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**



गुरुवारी ( २८ ऑगस्ट ) संपूर्ण बीड जिल्हाभर पावसाची रिपरिप सुरु होती . बीडसह महाराष्ट्रातील पावसाळ्यात पूरस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासनाचा आपत्ती व्यवस्थापन , मदत व पुनर्वसन विभाग तसेच बीड जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे . भारतीय हवामान विभागाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या इशाऱ्यांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व यंत्रणांना सतर्कतेचे निर्देश देण्यात आले आहेत . पूरप्रवण भागातील नागरिकांनी प्रशासनाशी पूर्ण सहकार्य करावे . नदी, नाले, धरण, तलाव या ठिकाणी जाणे टाळावे . सुरक्षित स्थळी हलण्यास प्रशासनाने सांगितल्यास त्वरित पाऊल उचला, असे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आवाहन केले आहे .

अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी नागरिकांना सूचना देताना अधिकृत सूचनांचे पालन करा, अफवांवर विश्वास ठेवू नका . महत्त्वाची कागदपत्रे, औषधे, अन्नसाठा आणि पिण्याचे पाणी सुरक्षित ठेवा , असे सांगितले . तर अंबाजोगाईच्या अपर

▶▶ उर्वरित पान २ वर

## अपघाताने एलसीबी ला २१ लाखाचा गांजा पकडण्यात यश



**बीड । प्रतिनिधी**

गस्तीवर असलेल्या एलसीबीचे वाहन पाहून कार चालकाने भरधाव वेगाने गाडी पळविल्याने नवगन राजुरी-खालापुरी रस्त्यावर अपघात घडला अन् कारची तपासणी केली असता त्यामध्ये पाच पोते १०५ किलो ७५० ग्रॅम किंमत २१ लाख १५ हजार रुपयांचा गांजा मिळून आला. याप्रकरणी दोन आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गांजा नगर जिल्ह्यातून विक्रीसाठी बीड जिल्ह्यात आणण्यात आला आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर






# पावसाचा कहर; वाण नदीत कार, रिक्षा वाहून गेला

## एक मृतदेह सापडला ; दुसऱ्याचा शोध सुरू



नितीन कंबळे (मयत)



रिक्षा चालक लोखंडे शोध सुरू



**धारूर । प्रतिनिधी**

तालुक्यात पावसाचा कहर केला असून, वाण नदीला पूर आला होता. यावेळी धारुर-आडस- अंबाजोगाई रस्त्यावरील अवरगाव जवळ रिक्षा वाहून गेला असून, तर अंजनडोह जवळ चारचाकी वाहून गेल्याची घटना घडली आहे. यातील अंजनडोह जवळील वाहून गेलेल्या नितीन कांबळे यांचा मृतदेह सापडला असून, रिक्षा चालकाचा शोध सुरू आहे. या नदीला पूर आला की, सतत पुलावरुन पाणी वाहून हा रस्ता बंद पडतो. प्रशासनाने याकडे लक्ष देऊन या पुलांची उंची वाढविण्याची मागणी करण्यात येत आहे. धारूर तालुक्यातील अंजनडोह येथील अडत व्यापारी नितीन शिवाजीराव कांबळे (वय ४२ वर्षे) हे रुई धारूर हून अंजनडोह कडे चारचाकी वाहनातून येत असताना वाण नदीला पूर आलेला होता. पुलावरून पाणी वाहत होतं, त्यांना पाण्याचा अंदाज न आल्यामुळे नितीन कांबळे हे गाडीसह वाहून गेल्याची घटना रात्री घडली आहे. रात्री पासून त्यांचा शोध सुरू होता. गुरुवारी (दि.२८) सकाळी

▶▶ उर्वरित पान २ वर

# नाथापूर ग्रा.पं. सरपंच अपात्र

## अपहारीत रक्कमम व्याजासह वसुलीचे आदेश ; बळवंत चव्हाण यांच्या अर्जावर वि. आयुक्तांचे आदेश

**बीड । प्रतिनिधी**



ग्रामसभा न घेणे, गाळे वाटप व इतर प्रकरणात आर्थिक अनियमितता करून अपहार करणे यांसह विविध प्रकरणांबाबत बळवंत चव्हाण यांनी केलेल्या तक्रार अर्जावर विभागीय आयु यांनी सुनावणी घेऊन कलम ३९ (१) नुसार नाथापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच मयुरी सुंदर चव्हाण यांना अखेर अपात्र घोषित केले आहे. यापूर्वी बळवंत चव्हाण यांच्या तक्रारीवरून त्यांचे सासरे मदन चव्हाण यांना जि.प.सदस्य म्हणून अपात्र केले होते.

▶▶ उर्वरित पान २ वर




# इतिहास कर्तृत्व विसरत नाही... आणि माफ ही करत नाही..!

'मा.फडणवीस साहेब,

मराठा समाजाची फसवणूक का केली ?

फडणवीस सरकारने आरक्षण दिलं तर टिकलं का नाही ?

आंदोलन करण्याची वेळ का आली ? ही फसवणूक नाही का ? लाखों लोक रस्त्यावर उतरतात तरी आरक्षणाचं गांभीर्य का कळत नाही.

गरीब मराठ्यांचा एवढा तिरस्कार का ?

लोकशाही मार्गाने न्याय हक्कासाठी लढणाऱ्या गरीब मराठ्यांना न्याय देण्या ऐवजी

कोंडी का केली जाते ?

पराचा कावळा करून ईमानदार मराठ्यांच्या नेतृत्वावर गरळ ओकली जाते, जिभ हासडण्याची भाषा केली जाते...हे सर्व कोणाच्या इशाऱ्यावर चालू आहे ?

२०१८ मध्ये फडणवीस सरकारने मराठ्यांना डएइउ या नावाने १६% आरक्षण दिलं.

हे समाजाचे थेट प्रश्न आहेत.

'पण त्यांना चांगलंच माहीत होतं की हा कायदा न्यायालयात टिकणार नाही. कारण ठोस आकडेवारी नव्हती, 'विशेष परिस्थिती सिद्ध करता आली नाही.

'आणि तेच घडलं – सर्वोच्च न्यायालयाने तो कायदा रद्द केला.

मराठा समाजाच्या दृष्टीने मा.फडणवीस साहेबांनी फसवणूक केली,

कारण –आश्वासन दिलं पण टिकणारं आरक्षण दिलं नाही.

तात्पुरता उपाय केला पण दीर्घकालीन तोडगा शोधला नाही.

मराठा समाजाच्या भावनांचा राजकीय वापर केला. श्रीमंत मराठ्यांना पाठीसी घालून गरीब मराठ्यांची अवहेलना कधी थांबणार.

खरं तर कायदेशीर टिकणारा मार्ग म्हणजे ओबीसी (कुनबी) प्रवर्गात समावेश....

तो मार्ग शोधण्याऐवजी फडणवीस सरकारने तात्पुरता राजकीय निर्णय घेतला.

विश्ववंदनीय छत्रपती शिवाजी महाराज यांचे अद्वितीय स्मारक अरबी समुद्रात उभा करणाऱ्यचा संकल्प

फडणवीस साहेब तुम्ही विसरून गेले.. किती दिवस स्म ारकाचं राजकारण करणार. हि शुध्द ऐतिहासिक फसवणूक नाही का...

समाजाची अपेक्षा काय होती ?

मराठा समाजाला तात्पुरती आश्वासने नको होती,

कायदेशीर टिकणारा तोडगा हवा होता.

हैद्राबाद व ईतर गॅझेट लागु करायला हवं होतं.

पण शासनाने दीर्घकालीन उपाय न शोधता केवळ आंदोलन शांत करण्यासाठी आणि निवडणुकीत मतं मिळवण्यासाठी हा निर्णय घेतला.

ही फसवणूक नाही का ?




'आंदोलन पेटलं की निर्णय,

'निवडणुका आल्या की घोषणा,

आणि नंतर जबाबदारी ढकलता न्यायालयावर!

मग हा खेळ नव्हे का ?

ही थेट समाजाच्या भावनांची फसवणूक नव्हे का ?

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पा.यांचा दोन वर्षापासून सातत्याने संघर्ष चालू असताना कोणताही तोडगा काढला नाही. ही मराठा समाजाची फसवणूक व अपमान नाही का.

समाजाचा इशारा

कोणी काय केलं...

इतरांकडे बोट दाखवून राजकारण करु नका. ९६ ९६ कुळी

श्रीमंत मराठ्यांच्या

पाठबळावर गरजवंत गरीब मराठ्यांचा लढा दडपण्याचा प्रयत्न कदापी करू नका.

राज्यात शक्तिशाली बहुमत, आणि केंद्रात सत्ता आहे.

प्रत्येक समाजाचे प्रश्न सोडवण्याची जबाबदारी

सत्ताधिशांची असते. मराठ्यांच्या भवितव्याच्या प्रश्नावर राजकारण करू नका..

पुन्हा आश्वासनाची खेळी वापरू नका..

कारण यापूर्वी.... आश्वासनांच्या खेळांनी फसवलं आम्हाला,

वचन दिलं तरी पाळलं नाही.

आता एकच इशारा लक्षात ठेवा,

हक्क न दिल्यास रणांगण पेटेल पुन्हा!

तात्पुरते निर्णय नकोत – आम्हाला कायदेशीर हक्क हवा!

राजकारण नको – संविधानात टिकणारं आरक्षण हवं!

आम्हाला तात्पुरते दिलासे नकोत,

आम्हाला भावनिक खेळ नकोत,

आम्हाला ओबीसी प्रवर्गातून कायदेशीर टिकणारं आरक्षण हवं आहे.

मराठा समाज फसवणूक सहन करणार नाही –

आम्ही लढू, आम्ही उभे राहू, आणि आमचा हक्क मिळवूनच थांबू!

–एक मराठा.

◆ पान ९ वरून पुढे...

## शिवनेरी गडाची...

ऐन गणेशोत्सवात मुंबईत आंदोलनाची घोषणा केली आहे. त्यांच्या समर्थकांसह ते मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. मराठा आरक्षणासाठी मुंबईतील आझाद मैदानात आमरण उपोषण करणार आहेत. गुरुवारी रात्री मराठा मुंबईत दाखल होणार आहेत. नवी मुंबईतून गुरूवारी रात्री अटल सेतूवर हा जत्था दाखल होईल तेथून मुक्तमार्गाने (फ्री वे) आझाद मैदानात रवाना होणार आहे. 'न भूतो न भविष्यती' असे हे आंदोलन होणार असल्याचा दावा करण्यात आल्याने पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था बिघडू नये यासाठी कंबर कसली आहे. पोलिसांची सत्वपरिक्षा– शुक्रवारचा दिवस पोलिसांची कसोटी पाहणारा ठरणार आहे. गणेशोत्सवातच मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन असल्याने पोलिसांवरील ताण वाढला आहे. त्यातच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा शुक्रवारीच मुंबईतील गणेशोत्सव दर्शनासाठी येणार आहेत. शहा हे मुंबईतील काही गणेशोत्सव मंडळ आणि मुंबईतील भाजप नेत्याच्या घरी गणेशाचे दर्शन घेण्यासाठी जाणार आहे. शहा यांच्या सुरक्षेसाठी मुंबईत कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे पोलिसांची सत्वपरिक्षा ठरणार आहे. मनोज जरांगे पाटील हे देखील आंदोलनापूर्वी लालबाग राजाच्या दर्शनाला जाणार आहे. पालघर, वसई, मधून हजारोंच्या संख्येने आंदोलक– शुक्रवारी होणाऱ्या आंदोलनासाठी मुंबईलगतच्या मिरा भाईंदर, वसई विरार आणि पालघर मधूनही हजारोंच्या संख्येने आंदोलक जाणार आहेत. त्याची जय्यात तयारी सुरू आहे. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह दिसून येत आहे. गैरसोय होऊ नये यासाठी आम्ही आमच्या लोकांना ट्रेनने जाण्याच्या सूचना केल्या आहेत, असे आंदोलक शंकर बने यांनी सांगितले. कितीही अडचणी आल्या तरी आम्ही मागे हटणार नाही असेही बने यांनी सांगितले. दरम्यान, गुरूवार दुपारपासून मुंबईत आंदोलनकर्ते दिसू लागले. आझाद मैदान, नरिमन पॉईंट, फोर्ट परिसरात आंदोलनकर्त्यांचे जथे फिरताना दिसत होते.

## राजधर्माचे पालन...

मराठा समाजाला आरक्षण देण्याची घोषणा करावी, असे हर्षवर्धन

◆ पान ९ वरून पुढे...

सपकाळ यांनी म्हटले आहे. टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील समाजासह मुंबईत पोहचत असताना सरकारने या आंदोलनात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. आता केवळ एक दिवसाची परवानगी दिली ती हास्यास्पद असून, तीन महिन्याआधी आंदोलनाची घोषणा केली होती तर सरकार एवढे दिवस काय झोपा काढत होते का? असा संतप्त सवाल सपकाळ यांनी केला. आरक्षणावर जातनिहाय जनगणना हा रामबाण उपाय आहे, हे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी स्पष्ट केले असून, त्यासाठी त्यांचा आग्रहही आहे. काँग्रेसशासित तेलंगणा व कर्नाटकात जातनिहाय जनगणना केलेली आहे. भाजपा सरकारमध्ये जर इच्छाशक्ती असेल तर त्यांनीही जातनिहाय जनगणना करावी व मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवावा असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

## पूरसंकटावर मात...

जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे–सोनवणे यांनी पूराच्या पाण्यातून पायी किंवा वाहनाने जाणे जीवघेणे ठरू शकते . मोबाईल चार्ज ठेवावा, सुरक्षित पाणीच वापरावे, असा इशारा दिला . जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रशांत वाघमारे यांनी नागरिकांना दिलासा देताना पूरस्थिती किंवा आपत्तीच्या प्रसंगी नागरिकांनी घाबरून न जाता तातडीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा . प्रशासन पूर्णपणे सज्ज असून त्वरित मदत पुरवली जाईल, असे सांगितले . त्यांचा संपर्क क्रमांक ९५६१४९९४४९ असून, याशिवाय आपत्कालीन क्रमांक १०७७ / १००० / ९९२ हे नेहमी खुले असतील . अधिकृत माहिती एस डी एम ए ऍट महाराष्ट्र या वेबसाईटच्या माध्यमातून मिळेल . पूर ओसरल्यानंतर घरात परतताना स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण आवश्यक आहे . दूषित पाणी व सडलेले अन्न टाळा, असे उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी कटाक्षाने नमूद केले . निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण शिवकुमार स्वामी यांनी नागरिकांसाठी पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना

◆ पान ९ वरून पुढे...

दिल्या आहेत : हवामान विभागाच्या इशाऱ्यांकडे गांभीर्याने लक्ष द्या . नदी, नाले, तलाव यांच्या पातळीतील बदलावर सतत लक्ष ठेवा . लहान मुले, वृद्ध, महिलांची विशेष काळजी घ्या . महत्त्वाची कागदपत्रे, औषधे, रोकड आणि कपडे सुरक्षित ठेवा . विजेच्या तारा, खांब, उपकरणांपासून दूर राहा . दूषित पाणी पिणे टाळा ; उकळलेले किंवा बाटलीबंद पाणीच वापरा . पूराच्या पाण्यातून पायी किंवा वाहनाने जाण्याचे टाळा . प्राण्यांना सुरक्षित ठिकाणी बांधा . प्रशासनाच्या किंवा बचाव पथकाच्या सूचनांचे पालन करा .

## अपघाताने एलसीबी ला....

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नवगन राजुरी परिसरात तपास करीत होते.यावेळी मारुती सुझुकी कंपनीची सियाझ कार चालकाने पोलिसांचे वाहन पाहून भरधाव वेगाने पळविली, काही अंतरावर गेल्यानंतर राजुरी रस्त्यावर हनुमान वस्तीजवळ सदरील कारचा अपघात घडला, याची माहिती मिळताच एलसीबीचे पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांनी पथकासह जाऊन पाहणी केली असता त्यामध्ये ५ काळ्या रंगाचे पोते आढळून आले.त्यामधून गांजा सारखा वास येऊ लागल्याने याची माहिती वरीष्ठांना दिली. माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, एलसीबीचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती खेडकर यांनी घटनास्थळी धाव घेतली पाहणी केली असता त्या पाच पोत्यांमध्ये १०५ किलो ७५० ग्राम गांजा मिळून आला. ज्याची किंमत २१ लाख १५ हजार रुपये आहे. तो जप्त करण्यात आला असून, याप्रकरणी आरोपी बाबासाहेब विश्वनाथ दहातोंडे रा. चांदा ता. नेवासा व दत्तु मुरलीधर सकट रा. टाकळी खंडेश्वरी ता. कर्जत जि. नगर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. हा गांजा नगर जिल्ह्यातून चांदा येथून बीड जिल्ह्यात विक्रीसाठी आणल्याचे सांगितले आहे. यामुळे नगर मधून बीडमध्ये गांजाची तस्करी होत असल्याचं उघड झाला आहे.

## पावसाचा कहर...

◆ पान ९ वरून पुढे...

६ वाजण्याच्या सुमारास पुलापासून काही अंतरावर मृतदेह आढळून आला आहे. पंचनामा करुन मृतदेह शवविच्छेदनासाठी धारुर येथील सरकारी दवाखान्यात हलविण्यात आला आहे. दुसरी घटना याच वाण नदीवरील धारुर–आडस– अंबाजोगाई रस्त्यावरील अवरगाव जवळील पुलावरुन पूराच्या पाण्यात धारूर तालुक्यातील गोपाळपूर अंतर्गत संभाजीनगर येथील ऑटो चालक लोखंडे ऑटोसह वाहून गेल्याची घटना घडल्याचे कळत आहे. रात्री पासून ग्रामस्थ शोध घेत आहेत. आज सकाळी रिक्षा नदीपात्रातून बाहेर काढण्यात आला. परंतु रिक्षा चालक अद्याप सापडला नसून तहसीलदार श्रीकांत निळे, सपोनि देविदास वाघमोडे यांच्यास प्रशासन घटनास्थळी तळ ठोकून आहे.

## नाथापूर ग्रा.पं...

यापूर्वी सासरा आणि आता सुन दोघांनाही अपात्र केल्यामुळे नाथापूर पंचक्रोषीत या प्रकरणाची मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आहे. विभागीय आयु ंनी नाथापूर ग्रामपंचायतमध्ये झालेल्या अनियमितता व आर्थिक गैरव्यवहारातील अपहारीत रक्कम व्याजासह वसुल करण्याचेही आदेश केले आहेत. माहे डिसेंबर २०२२ मध्ये मयुरी सुंदर चव्हाण यांची नाथापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी जनतेतून निवड झाली होती. त्यांच्या सरपंच पदाच्या कार्यकाळात त्यांनी नियमानुसार ग्रामसभेची नोटीस न काढणे, अवैध ग्रामसभा घेणे, वेळेवर ग्रामसभा न घेणे, गाळे वाटपात आणि त्यांचा किराया वसुल करण्यात आर्थिक अपहार करणे, ग्रामपंचायत अधिनियमांचे व लेखासंहितांचे उल्लंघण करणे, मागासवर्गीयांच्या विकासासाठी राखीव १५% टक्के निधी अखर्चित ठेवणे यांसह विविध गैर प्रकारांबाबत सबळ पुराव्यासह तक्रार सामाजिक कार्यकर्ते बळवंत चव्हाण व महादेव गिराम यांनी केली होती. विभागीय आयु , छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सरपंच मयुरी सुंदर चव्हाण यांच्या विरोधात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ (१) नुसार हे प्रकरण दाखल करण्यात आले होते. यामध्ये बळवंत चव्हाण यांच्यावतीने ॲड. विलास भुतेकर व ॲड.वैभव कुलकर्णी आणि महादेव गिराम यांच्यावतीने ॲड.नाईकवाडे व ॲड.खांडे यांनी काम पाहिले.

◆ पान ४ वरून पुढे...

## मराठा आंदोलक...

होते. मात्र नारायणगाव परिसरातच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. उपचाराआधीच त्यांचा मृत्यू झाला.मागील तीन वर्षांपूर्वी त्यांच्या एका मुलाचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला होता. आता स्वतःच्या निधनामुळे कुटुंबावर दुहेरी संकट ओढवले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी नंदुबाई, एक मुलगा (शिक्षण घेत आहे) आणि वृद्ध आई असा परिवार आहे. अचानक घडलेल्या या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. सतीश देशमुख यांच्या निधनाची माहिती मिळताच मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी तातडीने रुग्णालयात धाव घेतली आणि देशमुख यांचे बंधू व्यंकटेश देशमुख यांचे सांत्वन केले. यावेळी जरांगेंना पाहताच व्यंकटेश यांच्या डोळ्यांतून अश्रू अनावर झाले. हे हृदयद्रावक दृश्य पाहून उपस्थित कार्यकर्त्यांनाही अश्रू आवरता आले नाहीत.या प्रसंगी मनोज जरांगे यांनी देशमुख यांच्या कुटुंबियांचे धीर देत सांगितले की, सतीश देशमुख यांचे बलिदान व्यर्थ जाऊ देणार नाही. मराठा समाजाच्या हक्काच्या लढाईत त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील.

## श्री गणेशाच्य...

स्थापना करताना मुख्य यजमान म्हणून भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या हस्ते श्री गणेशाचे शास्त्र युक्त पद्धतीने वैदिक मंत्राच्या साह्याने विधिवत पूजा करून ही स्थापना करण्यात आली यावेळी येथे उपस्थित असलेले भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष शंकर भाऊ देशमुख साहेब तसेच देविदास नागरगोजे साहेब व नागरगोजे साहेब तसेच शांतिनाथ डोरले संकेत सानप कृष्णा खेंडेकर गणेश लांडे केशव बडे साहेब अनिल चांदणे डॉक्टर वनवे साहेब जिल्हा परिषद माजी अध्यक्ष मीराताई गांधले मॅडम राजू शहाणे अमोल वडकिले राजेश चरखा भालचंद्र कुलकर्णी बाबुराव परळकर व पत्रकार संजय देवा कुलकर्णी पिपळगावकर सह योगेश नाकाडे सह इतर सर्व पदाधिकारी व गणेश भाविक भक्त व भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी व श्री गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते श्री गणेशाची स्थापना विधिवत पूजा करण्यासाठी श्री वेदशास्त्र संपन्न विपुल रत्नपारखी देवा उपस्थित होते श्री गणेशाची स्थापना मोठ्या उत्साहामध्ये आणि मोठ्या आनंदाच्या भक्तीमय वातावरणामध्ये व पवित्र वैदिक मंत्राच्या जयघोषात संपन्न झाली आणि श्री गणेशाकडे सर्वांच्या वतीने प्रार्थना करण्यात आली की बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र चांगला पाऊस पडो सर्व लोक सुखाने गुना गोविंदाने नांदावे अशी प्रार्थना भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा अध्यक्ष यांच्या वतीने व उपस्थित सर्व गणेशभक्त यांच्या वतीने श्री गणराया कडे प्रार्थना करण्यात आली .

## इनसानियत फाउंडेशनच्या...

अध्यक्ष सोहेल शेख यांनी या रक्तदान शिबिरास प्रचंड प्रतिसाद देणाऱ्या विविध सामाजिक संघटना पक्ष व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आभार मानले.

◆ पान ४ वरून पुढे...

## पत्रकारांच्या आधी...

जनसामान्यांचा विकासनामाचे संपादक बाळासाहेब फपाळ यांचीही निवड करण्यात आली. तालुका अध्यक्षपदी प्रवीण वडमारे यांची नियुक्ती झाली. बैठकीत बीड जिल्हा संघटनेचे सचिव बालाजी जगतकर यांनी संघटनेच्या महत्त्वावर चर्चा केली आणि बीडच्या पत्रकारांच्या मुख्य म ागण्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन शासन स्तरावर दिले. आत्मलिंग शेटे यांनी पत्रकारांच्या आव्हानांवर विचार केला आणि आवश्यक त्या स्वीकृतीसाठी वरिष्ठ स्तरावर सहकार्याची हमी दिली. बैठकीच्या प्रारंभात उपस्थित पत्रकारांना पुष्पहार देऊन सत्कारण्यात आले. या बैठकीत संघटनेच्या विस्तारावर चर्चा करण्यात आली, तसेच पत्रकारांचे जाळे निर्माण करण्यासाठी संघटनात्मक बांधणीवर भर देण्यात आला, ज्यामुळे पत्रकार संघटनेची ताकद वाढवण्याची योजना आहे. समारोप ही बैठक बीड जिल्ह्यातील पत्रकारांसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरली असून, संघटनेतील एकजुटीचा आणि सहकाराचा संदेश सर्वत्र पोहोचवला गेला.

**आपले विचार व्यक्त करीत असताना आत्मलिंग शेटे यांनी सांगितले की स्वीकृती धारक पत्रकारांना अनेक बसेस मध्ये डावलले जाते शिवनेरी तसेच ई, –बस यामध्ये त्यांना प्रवास करता येत नाही तरी त्याबाबत लवकरच परिवहन मंत्री सरनाईक यांना सर्व पत्रकाराच्या वतीने राष्ट्रीय उपाध्यक्ष आप्पासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ भेटणार असल्याचे आत्मलिंग शेटे यांनी सांगितले.**

## केज शहरात...

मोठ्या उत्साहात झाले. गल्ली गल्ली मध्ये,घरोघरी लहान मुले व स्त्री पुरुषांची बाजारात जावून घरी गणपती बाप्पा ची मुर्ती आणण्यासाठी लगबग दिसून येत होती. केज शहरामध्ये बाजारपेठेत गणपती च्या आकर्षक व सुरेख मुर्ती विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. यावर्षी पाऊस चांगला झाल्याने बाजारपेठेत खरेदी साठी लोकांची गर्दी दिसून येत होती.शहरातील लोकांनी आनंदी वातावरणात भक्ती भावाने गणरायाची घरोघरी स्थापना केली.यावर्षी गणपती बाप्पा चा दहा दिवसांचा मुक्काम असून अकराव्या दिवशी अनंत चतुर्दशीला विसर्जन होणार आहे.

## कुर्ला जिल्हा...

विद्यार्थ्यांनी अत्यंत सर्जनशीलतेने व मनापासून मूर्ती घडवल्या. राऊत मॅडम, कुलकर्णी मॅडम, कांबळे मॅडम, पवळ सर, व शिंदे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत उपक्रम यशस्वी होण्यासाठी महत्त्वाचे प्रयत्न केले. शालेय व्यवस्थापन समितीने या उपक्रमासाठी पुढाकार घेतला. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीमुळे पर्यावरणाला होणारे नुकसान लक्षात घेता विद्यार्थ्यांना नैसर्गिक मातीपासून गणेशमूर्ती बनवण्याची प्रेरणा दिली. याम ुळे मुलांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव, सांस्कृतिक परंपरेबद्दल आदर आणि स्वावलंबनाची भावना विकसित झाली. शाळेच्या या उपक्रमामुळे इतर शाळांनाही प्रेरणा मिळेल आणि मुलांमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव

◆ पान ४ वरून पुढे...

साजरा करण्याची चळवळ अधिक जोमाने रुजेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## बीड शहर...

कें.प्र.श्री जफर खान सर श्री. अन्वर सर व श्री. शेख इरफान श्री चंद्रकांत शेळके साहेब (तहसीलदार बीड) श्री समंदर खान सर (गटशिक्षणाधिकारी प.स.बीड ) ,श्री खुर्शीद आलम (मा.न.प.सभापती बीड ) हाफेज खलील कुरेशी (अध्यक्ष शा.व्य.स.मोमिनपुरा बीड ), श्री. फेरोज खान सर (मार्गदर्शक व सेवानिवृत्त विस्तार अधिकारी ), जि.प.मोमिनपुरा उर्दू शाळेचे मुख्याध्यापक सय्यद वाजेद सर व जिल्हा परिषद पेठ बीड शाळेचे मुख्याध्यापक मसूद सर, सय्यद वाजेद अहमद सर जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प्रवीण काळम पाटील साहेब , सन्मानीय नांदुरकर साहेब (शि वि अ पं स गेवराई ) , सम्मानीय इलियास शेख (उपाध्यक्ष शा व्य स धोंडराई ) , केंद्रमुख विशाल कुलकर्णी सर , केंद्रीय मु अ सुलाखे सर , अध्यक्ष म्हणुन प्रशालेचे मु .अ शहाणे सर,जे एन जाधव सर श्री देशपांडे सर , सरपंच विजय राठोड, शा. व्य. समिती अध्यक्ष रामेश्वर पानखडे, , केंद्रप्रमुख विशाल कुलकर्णी सर, संतोष सर, नवनाथ पोटे, संतोष भाले, लहू पवार, संतोष कोरे, गणेश सानप, अंकुश शेवाळे, भारती मॅडम, अर्चना नागरे, दक्षा वानखेडे, सुप्रिया,खांडे पारगाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्री जलील सर डॉक्टर प्रवीण पालीमकर, विजय दादा पोकळे साहेब, बालासाहेब फपाळ विकासनामा पेपरचे संपादक, सुजाता सावंत, सरपंच गणेश घोडे, अध्यक्ष गणेश होळकर, मिथुन जोगदंड दैनिक दिव्य मराठीचे पत्रकार दत्ता प्रभाळे, दत्ता जाधव सीमा ओस्तवाल, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रियंका अनिरुद्ध क्षीरसागर व शाळेचे मुख्याध्यापक श्री दत्ता बनकर सर बऱ्हाणपूर गावचे सरपंच श्री गोरख शिंदे व सामाजिक कार्यकर्ते अनिरुद्ध क्षीरसागर ,बिबीशन क्षीरसागर सर व गावचे उपसरपंच गणेश लांडे ,अतुल लांडे, बबन क्षीरसागर, अशोक लांडे संपादक. संपादक श्री अशोक होळकर नाना, कुलकर्णी सर, विजय दादा पोकळे सामाजिक कार्यकर्ते, बाळासाहेब फपाळ संपादक, विकासनामा बीड. बापूराव बरबुडे सामाजिक कार्यकर्ते, गुजर नाना तसेच ज्ञानेश्वर तळेकर अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती के.प्रा.शा. मादळमोही, नामदेव पुरी अध्यक्ष, प्रा.शा. कन्या म ादळमोही, श्रीम. पठाण करंजुम अध्यक्षा, मुख्याध्यापिका संध्या दौंड प्रा.शा.कन्या मादळमोही, मुख्याध्यापक शेख अब्दुल अजीम प्रा.शा.उर्दू मादळमोही, मुख्याध्यापक अनंत डावकर जोहरवाडी, मुख्याध्यापक सुरेश वाघमारे बुधनेरवाडी, मुख्याध्यापक मिसाळ मॅडम, मा.कें.प्र.मादळमोही श्री मकरध्वज जगताप सर,श्री केंद्रिय मुख्याध्यापक मादळमोही श्री.म हादेव राजेसाहेब चव्हाण सर(राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त), शिक्षण विस्तार अधिकारी जाधव साहेब , केंद्र प्रमुख सोनवणे मॅडम , केंद्रीय मुख्याध्यापक समुद्रे , सर संजय कुलकर्णी पत्रकार , गणेश जाधव पत्रकार,दैनिक लोकाशा चे संपादक विजय राज्य बंब, शिवसेना जिल्हाप्रम ुख सचिन मुळक, मा. श्री.स्वप्निल भैया गलधर,मा.सभापती न. प.बीड खुर्शीद आलम,लोकमित्र चे संपादक शैख ताहेर, शालेय व्यवस्थापन

◆ पान ४ वरून पुढे...

समिती अध्यक्ष शैख उस्मान, दै. किसान चे कार्यकारी संपादक अदनान खान,जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सिद्धेश्वर माटे, मच्छिन्द्र वाघमारे, पठाण जफर खान,ऍड. खाजा बॉस, रवी,ऍड. वंदना पारवे, सविता जैन, सुरेखा झिंगे, कद्री, शिंदे वैशाल, शोभा कदम, संजय दराडे, नितीन भोसले, सखाराम शिंदे,संगीता वाघमारे, उषा सोनावणे, विठ्ठल जायभाय, भोंजीबा फ ुंदे,मनीषा काकडे, चव्हान सुरेखा,शेख अफसाना,औताने शुभांगी,संगीता अनोळे गट शिक्षण अधिकारी खान साहेब, तहसील दार शेळके साहेब ,नगर सेवक शुभम भैय्या धूत, उद्योजक रमेश घोलप साहेब ,पोलखोल संपादक नितेश उपपध्याय साहेब सतीश भाउ पाटील मदानरावजी चव्हाण लक्ष्मण अबुज रामभाऊ आबुज साळवे सर अशोक चव्हाण लहाने सर येडे सर सारडा सर, बीड जिल्हा संस्थाचालक महासंघ चे सचिव मा. उत्तमराव पवार , समर्थ विद्यालय शिरसमार्ग चे माजी मुख्याध्यापक श्री मोहनराव पवळ, श्री. सुभाषराव पवळ सर,समर्थ विद्यालय शिरसमार्ग चे मुख्याध्यापक श्री राजेंद्रजी केसभट, जि प केंद्रीय प्राथमिक शाळा शिरसमार्ग चे मुख्याध्यापक श्री साईनाथजी नाईकवाडे व ग्रामीण रुग्णालय शिरसमार्ग चे पवार सर, तांबारे सर,श्री आहेर सर, श्रीमान दहिवाळ सर केंद्र,श्री.आदिनाथ मोघे, उपसरपंच सरूबाई मोघे, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य श्रीमती. चव्हाण, श्रीमती. जिगे , मुखध्यापक गायसमुद्रे सर, भास्कळ सर, कोळेकर सर,उघडे सर, शरद तांबारे सर,श्री देशमुख सर,बालकल्याण समितीचे सदस्य व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष वारे,सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ धांडे , रवी धोंडगे, सविता जैन, श्री मुंडे सर ,तांदळे सर, श्रीमती आव्हाड मॅडम, श्रीमती मुंडे मॅडम, श्री मोराळे सर, श्री कुमार सर, श्री घोडके सर, श्रीमती गायकवाड मॅडम, श्रीमती जावळे मॅडम, गेवराईचे झडख बांगर सर , केन्द्र प्रमुख श्री मोरे सर, उर्दू तय्यब नगर शाळेचे अध्यक्ष श्री वसीम फारुकी सर व तीन्ही शाळांचे मुख्याध्यापक रफत सर, शहाबोदिन सर, व काझी अताउलला सर, सौ. मैनाताई बोराडे, उपशिक्षणाधिकारी जिप,मा. पी.पी.दलाई साहेब राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय बीड, सौ. जयश्रीताई विधाते सभापती तथा नगरसेविका न.प. बीड, मा. राजेंद्र खेडकर सर, श्री लक्ष्मीकांत अवढाळ सर, सौ. उषाताई लोंढे मॅडम साधनव्यक्ती पंचायत समिती बीड तसेच पत्रकार बंधू मा. बालाजी जगतकर,मा. केशव मुंडे, मा. गणेश शिंदे, भारती गुजर, तसेच ट्रेनि शिक्षिका शेख तब्बसुमू, नूतन ढाकणे, नगरसेवक मा.नृसिंह ( अण्णा) नाईकवाडे, प्रमुख अतिथी म्हणून नगरसेवक मा.श्री.गणेश वाघमारे, दै.वास्तव चे सहसंपादक मा.प्रतिक शामल कांबळे, दै.दिव्य मराठी चे गणेश जाधव, दै.मराठवाडा पत्र चे मा.दत्तात्रय नरनाळे, नोबेल उत्तमराव हजारे, संचालक मा.बाबुलाल पवार,केंद्राचे केंद्रप्रमुख तथा शिक्षण विस्तार अधिकारी श्री संजय मोरे, मुख्याध्यापक श्री राजकुमार पोपळघट सर,कन्या प्रशालेचे मुख्याध्यापक श्री विष्णू सोळुंके सर,पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर ज्येष्ठ पत्रकार श्री सुभाष सुतार,ज्येष्ठ पत्रकार श्री विनोद नरसाळे सर, श्री विष्णू सोळुंके सर,श्री राजकुमार पोपळघट सर श्री शिवाजी झेंडेकर, कवियत्री श्रीमती राजश्री मिसाळ मॅडम,श्रीमती केशर शिंदे मॅडम, श्रीमती मयुरी भंडारे मॅडम, सर्जेरावजी काळे,

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात...

### नागरिकांनी पावसाळ्यात सुरक्षिततेची दक्षता घ्यावी...

**बीड । प्रतिनिधी**

सद्यस्थितीत मान्सून सक्रिय असून बीड जिल्ह्यात ठिकविकाणी मुसळधार पावसामुळे नद्या, नाले, ओढे व पाणलोट क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह सुरू आहे. परिणामी अनेक ठिकाणी पुलावरून पाणी वाहत असून नागरिकांकडून निष्काळजीपणामुळे अपघातांच्या घटना घडत आहेत. सदर परिस्थितीचा विचार करून जिल्हा प्रशासनामार्फत सर्व नागरिकांना खालीलप्रमाणे आवाहन व दक्षता सूचना करण्यात आल्या आहेत. नागरिकांनी पावसाळ्यात पुढील प्रमाणे दक्षता घ्यावी. मुसळधार पाऊस सुरू असतांना अनावश्यक प्रवास टाळावा. पुराचे पाणी पुलावरून वाहत असल्यास पूल ओलांडू नये. पुराच्या पाण्यात पोहण्याचा प्रयत्न करू नये. पाण्याच्या खोलीचा अंदाज नसेल तर पाण्यात जाऊ नये. पुलावरून किंवा नाल्यांवरून पाणी वाहत असल्यास पूर पाहण्यासाठी नागरीकांनी तेथे गर्दी करु नये, तसेच नदीकाठ, ओढ्याकाठ किंवा धोकादायक ठिकाणी सेल्फी / फोटो काढण्याचा मोह टाळावा. नदीकाठच्या गावातील नागरिकांनी दक्ष रहावे, नदीच्या पाणी पातळीत वाढ होत असल्यास नदीपात्रापासून दूर जावे. पावसाच्या वेळी मुलांना नाल्याजवळ, नदीकाठी किंवा धरण परिसरात जाण्यास परवानगी देऊ नये. धरण क्षेत्र, बंधारे व जलाशय परिसरात पाण्याचा विसर्ग होवू शकतो, त्यामुळे त्या ठिकाणी गर्दी करणे टाळावे. वीज पडत असल्यास झाडाखाली किंवा मोकळ्या जागेत थांबू नये. पुराच्या वेळी पाळीव प्राण्यांना बांधून ठेवू नये. सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. ग्रामपंचायत, पोलीस पाटील, तलाठी किंवा स्थानिक प्रशासनाकडून मिळणाऱ्या सूचनांचे पालन करावे. पावसामुळे घरात पाणी शिरण्याची शक्यता असल्यास वीजपुरवठा बंद करून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे, तसेच जमिनीखालून जाणाऱ्या विद्युत तारांपासून सावध राहावे.दुषित पाणी पिऊ नये, पिण्याचे पाणी उकळून प्यावे व जेवणाआधी हात स्वच्छ धुवून घ्यावे. पूर ओसरल्यानंतर परिसर स्वच्छ करण्यासाठी प्रशासनास सहाय्य करावे व परिसर स्वच्छ ठेवावा, रोगराई पसरू नये याकरिता आरोग्य विषयक खबरदारी घ्यावी. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी (१०७७) त्वरित संपर्क साधावा. नागरिकांनी या कालावधीत निष्काळजीपणा टाळून आपल्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे. जिल्हा प्रशासन सर्वतोपरी दक्ष आहे. मात्र आपत्ती टाळण्यासाठी नागरिकांचे सहकार्य व सतर्कता अत्यावश्यक आहे, असे शिवकुमार स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारी, बीड यांनी कळविले आहे.

### बीड नगरपरिषद प्रभाग रचना प्रकरणी आक्षेप दाखल : अनिल उर्फ (वंडू) निसर्गन

**बीड । प्रतिनिधी**

नगरपरिषद बीड येथे जुनीच प्रभाग रचना जाहीर केली आहे. व या प्रभाग रचनेविषयी पक्ष अर्ज दाखल करण्याची मुदत ३१ऑगस्ट २०२५ अशी आहे. अनेक प्रभागातील वस्त्यांची व नगरांची फोड करून अनेक मतदारावर अन्याय केला आहे. याचा आक्षेप प्रभाग चार मधील अनिल उर्फ (बंडू) निसर्गन व अँड. राहुल साळवे यांनी आक्षेप नोंदवला आहे. प्रभाग चार विषयी आक्षेप अर्ज दि. २५ ऑगस्ट २०२५ रोजी विधीज्ञ जुनी प्रभाग रचना बदलून नवीन प्रभाग रचना तयार करावी म्हणून आक्षेप मुख्याधिकारी नगरपरिषद तथा निवडणूक अधिकारी यांच्याकडे दाखल केला आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशाचे पालन जुनी प्रभाग रचना निर्माण करताना केली नाही. काही लोकांचा राजकीय फायदा व्हावा या दृष्टिकोनातून मुख्य वस्त्यांचे विभाजन करून दुसऱ्या प्रभागात नावे जोडण्यात आली आहे. त्यामुळे जुनी प्रभाग रद्द करून नवीन प्रभाग रचना अमलात आणावी यासाठी आक्षेप घेतला आहे. प्रमुख व मुख्य वस्ती आहे तसेच ठेवून प्रभाग रचना करण्यात यावी अशी मागणी अनिल उर्फ (बंडू) निसर्गन व अँड. राहुल साळवे यांनी लेखी निवेदनाद्वारे नगरपालिकेकडे केली आहे.

### महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप-प्रादेशिक अधिकारी दर बुधवारी उपलब्ध राहणार

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील उद्योजकांच्या तसेच औद्योगिक संघटनांच्या अडी-अडचणी / समस्यावरील चर्चा करणेसाठी व निवारण करणेसाठी उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जालना हे आठवड्याच्या प्रत्येक बुधवारी, जिल्हा उद्योग केंद्र, संचेती बिल्डिंग, गुड लक हॉटेल जवळ, एम.एस.ई.बी. ऑफिस समोर, जालना रोड, बीड येथे उपलब्ध असतील. असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ छत्रपती संभाजीनगरचे प्रादेशिक अधिकारी यांनी कळविले आहे.

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी दर बुधवारी उपलब्ध राहणार

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील उद्योजकांच्या तसेच औद्योगिक संघटनांच्या अडी-अडचणी / समस्यावरील चर्चा करणेसाठी व निवारण करणेसाठी प्रादेशिक अधिकारी, छत्रपती संभाजीनगर हे आठवड्याच्या प्रत्येक बुधवारी बीड येथील महामंडळाच्या उपअभियंता यांचे कार्यालयात उपलब्ध असतील. असे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगरचे प्रादेशिक अधिकारी यांनी कळविले आहे.

### ऊर्मिलाताई आनंदगांवकर यांचे निधन



**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील आनंदगाव येथील मूळ रहिवासी सध्या केज येथील निवासी जेष्ठ महिला उर्मिलाताई माणीकराव आनंदगांवकर वय ७१ वर्ष यांचे अंबाजोगाई येथे उपचारादरम्यान निधन झाले. मंगळवार रोजी सायंकाळी केज येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या धार्मिक प्रवृत्तीच्या व प्रेमळ स्वभावाच्या म्हणून त्या परिचित होत्या.कवी सेवानिवृत्त प्रा कवी माणिकराव आनंदगावकर यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात पती ,मुलगा ,सून नातवंडे असा मोठा परिवार आहे. बँक मॅनेजर महेश कुलकर्णी यांच्या त्या मातोश्री होत.

# आज देशाला नेत्याची नाही तर कार्यकर्त्यांची गरज : अॅड. अजित देशमुख

**पुणे । प्रतिनिधी**



देशात आज समाजाचे प्रबोधन होणे आवश्यक आहे. लोकविकास आणि लोकशिक्षण गरजेचे झाले असून त्यासाठी कार्यकर्त्यांनी अहोरात्र प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यामुळे स्वराज्य जनजागृती परिषदेच्या माध्यमातून आपल्याला लोकशिक्षण आणि लोकजागृतीची चळवळ उभी करावयाची आहे. व्यक्तीला नव्हे तर भ्रष्ट व्यवस्थेला विरोध या तत्त्वाने ही संघटना चालणार असून जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी या संघटनेत सहभाग नोंदवावा. आज नेत्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे देशाला आज नेत्याची नाही तर कार्यकर्त्याची गरज असल्याचे प्रतिपादन स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष अॅड. अजित एम. देशमुख यांनी केले.

पुणे येथील मध्यवस्तीत असलेल्या गांजवे चौकातील पत्रकार संघाच्या भवनांमध्ये सुंदर असा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात बोलताना अॅड. अजित देशमुख पुढे म्हणाले की, कार्यकर्ते उभे करण्यासाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सक्रिय होणे आवश्यक आहे. राज्य, जिल्हा, तालुका स्तरापर्यंत लवकरात लवकर पोहोचण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे पदाधिकाऱ्यांसोबत कार्यकर्त्यांनी देखील संघटन वाढीसाठी प्रयत्न करावेत. कार्यकर्त्यांना घडवण्यासाठी मेहनत घेतली जाईल. कार्यकर्त्यांना काम कसे करावे, याचे प्रशिक्षण देखील वेळोवेळी दिले जाईल, असेही अॅड. देशमुख यावेळी म्हणाले.

परिषदेचे उपाध्यक्ष संदीप जगताप (सातारा) यांनी यावेळी आपले मत व्यक्त करत असताना समाज प्रबोधनाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी वेगवेगळ्या माध्यमातून कार्यकर्त्यांनी कसा संपर्क ठेवावा, याविषयी मार्गदर्शन करत कार्यकर्ता ताठ मानेने उभा राहिला तरच समाज जागृत होईल, असे म्हटले. माजी अप्पर जिल्हाधिकारी के. सी. कारकर हे यावेळी प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी कार्यकर्त्यांनी एक पंचसूत्री ठरवावी आणि त्या पंचसूत्रीचे पालन करून समाजामध्ये चांगली प्रतिमा निर्माण करणारे कार्यकर्ते तयार करावेत, असे प्रतिपादन केले. तर यावेळी प्रा. महादेव घुले यांनी वेळ देणारे कार्यकर्ते चळवळीत आले तर चळवळ यशस्वी होते, असे सांगितले. सेवानिवृत्त मुख्याध्यापक घुगे सर यांनी देशात लोकांमध्ये पसरत चाललेला अनुत्साह थांबवण्यासाठी कार्यकर्त्यांनी जनतेमध्ये जावे, असे म्हटले. तात्या सावंत यांची उपस्थिती देखील महत्त्वाची ठरली. यावेळी अनेक वक्त्यांचे छोटे खाणी विचार देखील ऐकून घेण्यात आले. पुणे विभागातील सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि पुणे या पाच जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचा हा मेळावा यशस्वी करण्यासाठी परिषदेचे कोषाध्यक्ष शिवाजीराव खेडकर यांनी मेहनत घेतली. त्यांना तुषार कुटे, अवि देवकर यांच्यासह इतरांनी मदत केली. पाचही जिल्ह्याच्या प्रतिनिधींनी या मेळाव्याला हजेरी लावली. पुण्यातील एक उत्कृष्ट कार्यक्रम या निमित्ताने पार पडला. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी गणेश सातव यांनी सूत्रसंचालन चांगल्या पद्धतीने पार पाडले. तर आभार प्रदर्शन सचिन थोरात यांनी केले.

## स्वाराती रुग्णालयातील खाटांची संख्या 450 वरुन 1150 करण्याचा राज्य शासनाचा ऐतिहासिक निर्णय!

- अत्याधुनिक उपचार पद्धतीमुळे आरोग्यसेवा होणार सक्षम ;
- आ. नमिता मुंदडा यांच्या अभ्यासपूर्ण पाठपुराव्याला यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**




येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचा विकास आराखडा निर्णायक टप्प्यात पोहोचला आहे. स्वाराती रुग्णालयातील खाटांची संख्या ४५० वरून वाढवून ११५० करून सुसज्ज शासकीय रुग्णालय उभारण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या आहेत. या महत्त्वपूर्ण घडामोडीमागे केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे महत्त्व आहे.

ग्रामीण भागातील रुग्णांना अत्याधुनिक आरोग्यसेवा मिळावी, स्थानिक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी नवी दारे खुली व्हावीत यासाठी आमदार मुंदडा यांनी राज्य पातळीवर सतत पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळेच उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक घेण्यात आली.

या बैठकीत रुग्णालयाच्या मास्टर प्लॅनचा आढावा घेण्यात आला. रुग्णालयातील खाटांची संख्या ४५० वरून ११५० करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. तसेच आधुनिक सुविधा, सुपर स्पेशालिटी सेवा, उत्कृष्ट वैद्यकीय उपकरणे यांचा समावेश असलेला आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आमदार नमिता मुंदडा यांनी ग्रामीण आरोग्य सेवेसाठी आवाज उठवून या रुग्णालयाचा चेहरामोहरा बदलण्याचे काम प्रत्यक्षात आणले आहे. मराठवाड्यातील लाखो रुग्णांना आता बीड जिल्ह्यातच तज्ज्ञ सेवा मिळणार असून, उपचारासाठी पुणे-मुंबईसारख्या महानगरांकडे धाव घेण्याची वेळ मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. हा निर्णय ग्रामीण आरोग्यसेवेच्या इतिहासात महत्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

बैठकीला वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, संचालक डॉ. अजय चंदनवाले, अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या लोकोपयोगी महत्त्वाच्या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ना. पंकजाताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

## मराठा आरक्षणाच्या निर्णायक लढाईत मोठ्या संख्येने सहभागी व्हा : गणेश बजगुडे पाटील




**बीड । प्रतिनिधी**


गेली अनेक वर्षांपासुनचा मराठा आरक्षणाचा लढा आज निर्णायक टप्प्यावर पोहचलेला असुन मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी लाखो मराठा बांधव मराठा आरक्षणाच्या या ऐतिहासिक लढाईत सहभागी होणार असुन आपण देखील मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन बीड तालुका कॉँग्रेसचे अध्यक्ष तथा शिवक्रांती युवा परिषदेचे संस्थापक गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मागील दोन वर्षांपासुन मराठा आरक्षणाची लढाई अधिक तीव्र झालेली असुन गेली चाळीस वर्षापासुनचा हा लढा आज शेवटच्या टप्प्यात असुन २९ ऑगस्ट रोजी लाखो मराठे राज्याच्या राजधानीत धडकणार असुन आरक्षण घेतल्याशिवाय आता मुंबई सोडायची नाही असा ठोस निर्णय करुन आता नाही तर कधीच नाही याप्रमाणे आपण सर्व मोठ्या ताकतीने या आरक्षणाच्या ऐतिहासिक लढाईचे साक्षीदार होऊया. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळेच अनेक मराठा बांधव आज ओबीसी प्रवर्गात आलेले आहेत. आपल्या कुणबी असल्याच्या नोंदी असुन देखील आपल्याला आरक्षणाचा लाभ मिळत नव्हता आज काही प्रमाण जरी मराठा समाजाच्या कुणबी नोंदी मिळालेल्या असल्या तरी सगे सोयरे व मराठवाडा गॅजेट ची अंमलबजावणी करुन मराठा कुणबी, कुणबी मराठा एकच असुन सर्व मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश करावा .

## मानाचा युवराज गणेश मित्र मंडळाची कार्यकारिणी

**कडा । प्रतिनिधी**







येथील मानाचा गणेश मंडळ म्हणून ओळख असलेला बाराभाई गल्लीतील मानाचा युवराज गणेश मित्र मंडळाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. युवराज गणेश मित्र मंडळ हे गत ५५ वर्षांपासून सार्वजनिक गणेशोत्सव परंपरा जोपासत आले आहे. गणेशोत्सव सोहळा २०२५ साजरा करण्यासाठी मंगळवार रोजी दुपारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सर्वानुमते पुढीलप्रमाणे कार्यकारिणी निवडण्यात आली. अध्यक्ष पदी सुरेश उर्फ बाबु तारू, उपाध्यक्ष पदी महेश दळवी तर सचिवपदी सागर बोराटे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी मंडळाचे पाच वेळेस अध्यक्ष पदी राहणारे पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते रहेमान सय्यद, घन;शाम ढोबळे पाटील, पोलिस उपनिरीक्षक किरण राऊत, आल्ताब शेख,अविनाश ढोबळे, विघ्नेश तारू, शुभम तारू, आरबाज तांबोळी, शिवम इंगवले, आरिफ शेख, ओंकार जठाडे, सलमान सय्यद, विशाल बोराटे, निलेश ढोबळे, आदित्य मोरे, गणेश जठाडे, आवेज पठाण, दर्शन दळवी, मुसेब पानसरे, महेश होळकर, प्रसाद नांगरे, आयान शेख, केतन खंदारे, विक्रम तारु, शिवम तारु, मोईन शेख, अलतमश सय्यद, तन्वीर खान, आकिब खान, सागर खामट, शोएब पानसरे, मुस्तफा सय्यद, रूषी थेटे, आनंद पाचारणे, सह आदी सदस्य उपस्थित होते.

## कायदा व सुव्यवस्था बिघडविणारा कोणीही असो गय केली जाणार नाही : पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत

- प्रा. लक्ष्मण हाके सह १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई शहरात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केल्याप्रकरणी १४ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ अंतर्गत विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २५ ऑगस्ट २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक, गेवराई येथे घडली.

प्रा. लक्ष्मण हाके हे गेवराई येथे येणार होते त्यामुळे पोलीसांनी प्रा. हाके यांनी गेवराई शहरात येवू नये यासाठी त्यांना प्रतिबंधक नोटीस बजावली होती. मात्र, तरीही प्रा. लक्ष्मण हाके यांनी पोलीसांचा आदेशाला न जुमानता ते आपल्या कार्यकर्त्यांसह गेवराई शहरात आले आणि छत्रपती शिवाजी महाराज चौकात थांबले. चौकात थांबुन त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्याच वेळी काही लोक प्रा. हाके यांचा निषेध करत होते. पोलिसांनी प्रा. हाके यांना पुढील प्रवासासाठी निघून जाण्याची सुचना केली असता, प्रा. हाके व त्यांचे कार्यकत्यांनी पोलीसांच्या सुचनांकडे मुद्दामहून दुर्लक्ष केले आणि ते तिथेच थांबले. यावेळी, प्रा. हाके यांच्यासोबत असलेल्या सुनील ढाकणे नावाच्या व्यक्तीने आपल्या पायातील चप्पल काढून जमावाच्या दिशेने फेकली. यामुळे दोन्ही गटांमध्ये घोषणाबाजी झाली आणि ते एकमेकांच्या अंगावर धावून गेले. बळीराम खटके यांनीही जमावाला चिथावणी देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आमदार समर्थकांनी प्रा. हाके यांच्या दिशेने दगड आणि चप्पला फेकल्या. दोन्ही गटांमध्ये शिवीगाळ झाली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी सौम्य बळाचा वापर करून दोन्ही गटांना पांगवले आणि प्रा. हाके यांना सुरक्षितपणे बाहेर काढले.

# आ. सुरेश धस यांच्या भगीरथ प्रत्यनाने जलसंजीवनी

- सिंदफणा नदीवरील दोन बंधाऱ्याचा विस्तार व बॅरेजमध्ये रूपांतर करण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी
- श्री गणरायाच्या आगमनानिमित्त आ.धस यांच्याकडुन बळीराजाला गिफ्ट

**शिरूर का. । प्रतिनिधी**



शिरूर कासार तालुक्यातील सिंदफणा नदीवरील निमगाव मायंबा आणि ब्रम्हनाथ येळंब येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचा विस्तार करून त्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर करण्याच्या मागणीला अखेर शासनाने मान्यता दिली आहे. २६ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या महत्वाकांक्षी योजनेला हिरवा कंदील देण्यात आला असून या निर्णयामागे आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्याच्या जीवनात जलसंजीवनी येणार असून आमदार सुरेश धस यांच्या भगीरथ प्रयत्नाने सिंदफणा नदीवरील दोन कोल्हापुरी बंधाऱ्यास मॅरेज मध्ये रूपांतर करण्यासाठी मंजुरी मिळाली असून आमदार सुरेश धस यांनी श्री गणरायाच्या आगमनाचे बळीराजाला एक गिफ्ट दिलं असल्याने आनंदो त्सव साजरा केला जात आहे. यापूर्वी १ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रकल्पाच्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली होती. त्यानंतर प्रशासकीय मान्यतेसाठी आमदार सुरेश धस यांनी राज्य शासनाच्या पातळीवर सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळत मंत्रिमंडळ बैठकीत अंतिम निर्णय घेण्यात आला आहे.

सिंदफणा ही नदी हंगामी वाहणारी नदी असल्यामुळे १५ ऑक्टोबर नंतर बऱ्याच वेळा प्रवाहित नसते त्यामुळे बंधाऱ्यात पाणीसाठा होत नाहीत तसेच मोठ्या संख्येने असलेल्या अर्ध्या मीटरचे दरवाजे बसवल्यानंतर ऑक्टोबर,नोव्हेंबर मध्ये अवकाळी पावसामुळे नदीला पूर आल्यास दरवाजे वेळेवर काढता न आल्याने पूर पातळी वाहून तीरावरील माती भराव वाहून जाऊन बंधाऱ्यांचे फार मोठे नुकसान होते. याबाबत आमदार सुरेश धस यांच्याकडे वेळोवेळी ग्रामस्थांनी मागणी केली असता या मागणीनुसार पर्यायी मार्ग म्हणून सदर कोल्हापुरी बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रूपांतर करावे अशी मागणी केली होती या मागणी ला आज मंत्रिमंडळात मान्यता मिळाली आहे. निमगाव मायंबा, ब्रह्मनाथ येळंब व आसपासच्या गावांचे शाश्वत पाण्यामुळे शेकडो हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊन सिंचन क्षेत्र वाढणार आहे.पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल तसेच भूजलपातळी उंचावून संपूर्ण परिसरातील पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होऊन दुष्काळी भाग जलयुक्त होणार आहे. त्यामुळे शेतकरी व नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे आमदार सुरेश धस यांनी सांगितले. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री मा.ना. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री मा.ना. एकनाथरावजी शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.अजितदादा पवार, जलसंपदा मंत्री मा.ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह भाजप महायुती सरकारमधील सर्व मंत्रीमंडळाचे आभार मानले आहेत.आष्टी मतदारसंघाचे भाग्यविधाते आमदार सुरेश धस यांचे निमगाव मायंबा,ब्रह्मनाथ येळंब व आसपासच्या गावाच्या ग्रामस्थांनी आनंद उत्सव साजरा करत आभार मानले आहेत.

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शुक्रवार, दि. २९ ऑगस्ट २०२५ • पान ४

# आरक्षणासाठी जाणाऱ्या बांधवांनी स्वस्त पेट्रोल डिझेल योजनेचा लाभ घ्यावा: खुर्शीद आलम

## ही योजना महेश शिंगण यांनी कालिका हायवे सर्विस नेकनुर येथुन सुरू केली आहे

**बीड । प्रतिनिधी**

मराठ्या बांधवांना आरक्षण मिळावे यासाठी संघर्ष योद्धा मा.जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मराठा आरक्षणासाठी शेवटच्या आंदोलन म्हणून दि.२९ रोजी मुंबईच्या आझाद मैदानावर आरक्षण आंदोलनचे नियोजन करण्यात आले आहे, सदर आंदोलनाला गोर गरीब बांधव आपले सर्व छोटे मोठे व्यवसाय बंद करून मुंबईत जाणार आहेत, मराठा समाजाच्या आरक्षणाला आपलेही हातभार लागावे या हेतूने फुल नाही तर फुलाची पांकळी म्हणून बीड येथील जाणता राजा युवा मंच चे संस्थापक अध्यक्ष समाजसेवक महेश शिंगण यांनी त्यांचे नेकनुर येथील कालिका हायवे सर्विस या पेट्रोल पंपावर पेट्रोल डिझेल भरणाऱ्या प्रत्येक वाहनाला सलग २७,२८,२९ पर्यंत आरक्षणाला जाणाऱ्या प्रत्येक वाहनाला प्रति लिटर दोन रुपये प्रमाणे कमी दराने पेट्रोल डिझेल देण्याचे नियोजन करण्यात आले असून या योजनेचा उद्घाटन दि.२६ ऑगस्ट रोजी बीड नगरपरिषदेचे माजी सभापती तथा शरदपवार राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी खुर्शीद आलम यांनी सर्व बांधवांना लाभ घेण्याचे आवाहन केले आहे, यावेळी महेश शिंगण म्हणाले की नेकनुर येथील माझ्या पेट्रोल पंपावर प्रत्येक वाहनाला पेट्रोल डिझेल प्रति लिटर दोन रुपये कमी दराने तीन दिवसासाठी मिळेल याच्या लाभ सर्व मराठा सह सर्व समाज बांधवांनी बांधवांनी घ्यावा असे आवाहन केले आहे,




# मराठा आंदोलक सतीश देशमुख यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू;जरांगेंनी दिले सांत्वन

## वरपगावचा आंदोलक मुंबई मोर्चासाठी निघालेल्या वाटेवरच कायमचा थांबला

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या आंदोलनासाठी मुंबईकडे निघालेल्या वरपगाव (ता. केज) येथील आंदोलक सतीश ज्ञानोबा देशमुख (वय ४५) यांचा पुणे जिल्ह्यातील नारायणगावजवळ हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे आंदोलनात शोककळा पसरली आहे. सतीश देशमुख हे मित्रासोबत मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या मुंबई मोर्चासाठी रवाना झाले



► उर्वरित पान २ वर

# श्री गणेशाच्या दिव्यमूर्तीचे भारतीय जनता पार्टी कार्यालय बीड येथे मोठ्या उत्साहात स्थापना

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा भारतीय जनता पार्टी कार्यालयाच्या ऑफिसमध्ये आज भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष शंकर भाऊ देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली श्री गणेशाची स्थापना करण्यात श्री गणेशाची ► उर्वरित पान २ वर



# इनसानियत फाउंडेशनच्या रक्तदान शिबिरास मोठा प्रतिसाद

## १०१ रक्तदात्यांनी केले रक्तदान ; समाजातील प्रतिष्ठित नागरिकांचा सहभाग

**बीड । प्रतिनिधी**

हजरत शहेनशाह वली दर्गा उरुस निमित्त इनसानियत फाउंडेशनच्या वतीने रक्तदान भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . या रक्तदान शिबिरास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. १०१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

इनसानियत फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख सोहिल संस्थापक, रिजवान चाऊस ,संस्थापक उपाध्यक्ष, शेख आवेज संस्थापक सचिव, यांच्या वतीने व इनसानियत फाउंडेशनच्या वतीने हजरत शहेनशाह वली दर्गा उरुस निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी होत रक्तदान केले . या रक्तदान शिबिरास प्रोत्साहन देण्यासाठी शहरातील विविध सामाजिक संघटना पक्ष व प्रशासकीय अधिकारी तथा पोलीस अधिकाऱ्यांनी या रक्तदान शिबिरस भेट दिली. इनसानियत फाउंडेशनच्या वतीने हजरत शहेनशाह वली दर्गा उरुस निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या संख्येने रक्तदात्यांनी सकाळपासूनच रक्तदान करण्यास सुरुवात केली. तब्बल १०१ पेक्षा अधिक नागरिकांनी रक्तदान शिबिरास प्रतिसाद देत रक्तदान केले. इन्सानियत फाउंडेशनचे संस्थापक ► उर्वरित पान २ वर




# पत्रकारांच्या आधी स्वीकृतीसाठी सर्वतोपरी मार्गदर्शन व सहकार्य करणार: आत्मलिंग शेटे

• बीड जिल्हा कार्यकारिणीच्या विस्ताराची बैठक

**बीड । प्रतिनिधी**


भारतीय लघु व मध्यम पत्रकार संघटनेची बैठक २६ ऑगस्ट २०२५ रोजी बीड जिल्हा शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आली. या बैठकीत मराठवाड्याचे अध्यक्ष आत्मलिंग शेटे यांनी अनेक नवे पदाधिकारी नियुक्त केले. दैनिक महाभारतचे जिल्हा प्रतिनिधी नितीन जोगदंड यांना जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्त करण्यात आले. याशिवाय दैनिक लोकनेताचे जिल्हा प्रतिनिधी विजय रोडे, बीड स्वरधाराचे संपादक कृष्णा शिंदे, आणि दैनिक महाराष्ट्र प्रतिमाचे इरफान सय्यद यांना संघटक म्हणून नियुक्तीपत्र देण्यात आले. न्यूज २३ मराठीचे गणेश शिंदे यांना जिल्हा सदस्यपदी निवडण्यात आले, तसेच दैनिक परळी नगरीचे दत्ता शिवगण आणि दैनिक ► उर्वरित पान २ वर



# केज शहरात घरोघरी गणरायाचे उत्साहात आगमन

**केज । प्रतिनिधी**

गणेश चतुर्थी निमित्ताने यावर्षी देखील केज शहरामध्ये गणरायाचे आगमन अगदी थाटामध्ये झाले. हिंदु संस्कृतीमध्ये ऑगस्ट महिना प्रामुख्याने सण उत्सवाचा असतो. रक्षाबंधन झाले की,ऑगस्ट महिन्यात येणारा उत्साहाचा व आनंदाचा सण म्हणजे गौरी गणपती उत्सव. यावर्षी दि.२७-०८-२०२५ बुधवार रोजी घरोघरी गणपती बाप्पा चे आगमन आनंदात व ► उर्वरित पान २ वर



# बीड शहर व ग्रामीण भागात ६५ दिवसात २२१ शाळेत १ लाख ६० हजार वह्या व शालेय साहित्य वाटप

## प्रयास फाउंडेशन मुंबई व गुरु आनंद महिला प्रतिष्ठान चा कौतुकास्पद उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा तथा ज्येष्ठ समाजसेविका सौ सीमा ओस्तवाल यांनी गेल्या दोन अडीच महिन्यात ग्रामीण भागासह शेरी भागातील जिल्हा परिषद शाळेत जात ज्येष्ठ नागरिक, पत्रकार, राजकीय,सामाजिक, अधिकारी,डॉक्टर,वकील तसेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत गेल्या दोन अडीच महिन्यात बीड शहरासह ग्रामीण भागातील जिल्हा परिषद व प्रार्थमिक माध्यमिक विद्यालयात प्रयास फाउंडेशन मुंबई व गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या माध्यमातून प्रत्येक शाळेत जात विद्यार्थ्यांना वह्या. पेन्सिल -खुटलबर पाट्या,पेन, व शालेय साहित्य वाटप केले. बीड शहरात व ग्रामीण भागातील गेल्या ६५ दिवसात २२१ शाळेत १लाख ६० हजार वह्यांचे यशस्वीरीत्या वाटप केले आहे. बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून यांचा उपक्रम सातत्याने सुरू आहे.

या शैक्षणिक चालू वर्षात जिल्हा परिषद व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वह्या वाटपाचे कार्य दैनंदिन ६५ दिवस चालू राहिले. या दिवसात बीड शहरासह जिल्ह्यातील विविध मान्यवरांच्या उपस्थित विविध शाळेत परिसरात हा कार्यक्रम संपन्न झाला. प्रयास फाउंडेशन मुंबई व गुरु आनंद महिला प्रतिष्ठानचे अध्यक्षा सौ सीमा ओस्तवाल यांना सहकार्य केले सर्व ज्येष्ठ समाजसेवक,पत्रकार,वकील, डॉक्टर, विविध क्षेत्रातील अधिकारी हे खालील प्रमाणे आहेत.सीमा ओस्तवाल: सौ. सीमा ओस्तवाल (अध्यक्ष गुरू आनंद महिला प्रतिष्ठान बीड)मा. श्री.लक्षमन बारगजे(समाज कल्याण निरीक्षक बीड ,मा. श्री. जालिंदर धांडे (दै. प्रारंभ.संपादक बीड) मा.श्री. केशव कदम (दै. कार्यरंभ बीड) मा. श्री. खुर्शीद आलम सर(मा.न.प.सभापती.बीड) मा. श्री. सिध्देश्वर माटे सर(जे. शि. विस्तार अधिकारी बीड) हकिम मणियार सर(केंद्र. प्रमुख. अशोक नगर बीड) श्रीमती. कमल लांडगे मॅडम (मुख्याध्यापक केंद्र. प्रा. शा. अशोक नगर बीड)

श्रीमती संगीता लोढा, श्रीमती निता कोटेचा, श्री. हकीम सर

► उर्वरित पान २ वर



## थोडक्यात...

### भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा पदी सौ. सुवर्णाताई लांभरुड



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील मुगगाव येथिल भाजपाच्या निष्ठावान कार्यकर्त्या तसेच पाटोदा पंचायत समितीच्या सभापती सौ सुवर्णाताई लांभरुड यांची बीड जिल्हा भाजपाच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षापदी निवड झाल्याने पाटोदा तालुक्यात सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. बीड जिल्हा अध्यक्ष शंकर देशमुख यांनी पक्षाच्या विविध पदाधिकाऱ्यांची आज घोषणा करण्यात आली असुन या पदाधिकारी निवडीत ना पंकजा मुंडे यांच्या कार्यकर्त्यांचा वरचष्मा दिसत आहे. ना पंकजाताई मुंडे तसेच माजी आमदार भिमराव धोंडे यांच्या निकटवर्तीय सौ. सुवर्णा ताई लांभरुड यांना पक्षाच्या निष्ठेचे फळ मिळाले असुन बीड जिल्हा भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा पदाची जबाबदारी दिली असल्याने त्यांचा सन्मानाचे पद देऊन पक्षाने एका कर्तबगार महिलेवर जबाबदारी दिली आहे. सौ लांभरुड या संघटनात्मक पातळीवर पक्षाच्या निष्ठावंत महिला कार्यकर्त्या आहेत. त्या पाटोदा पंचायत समितीच्या सभापती असुन पक्षानी दिलेल्या कोणत्याही जबाबदारीत त्या पार पाडत आहेत. सौ सुवर्णाताई लांभरुड यांच्या निवडीमुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### पत्रकार रविंद्र राऊत ची कन्या धनश्री एमबीबीएस पात्र



**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील पत्रकार तथा दस्तऐवज लेखक रविंद्र मधुकर राऊत यांची कन्या धनश्री रविंद्र राऊत रा.कवडगाव(बु)ता.वडवणी ह.मु. अशोकनगर,माजलगाव हि एमबीबीएस डॉक्टर च्या शिक्षणासाठी पात्र झाली आहे. गुणवत्ते नुसार शासकीय कोट्यातून कु.धनश्री राऊत हि बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात गुणवत्तेनुसार प्रवेशपात्र ठरली ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. तसेच तीचे मुळगाव कवडगाव(बु) ता. वडवणी येथील चार विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेत आहेत तर याच गावातील पोलीस खात्यात २०ते २२ युवक कार्यरत आहेत. धनश्री राऊतने अतिशय मेहनतक, जिद्द, चिकाटीने स्वयं अध्ययनातून तिने हे यश मिळविले आहे. तिने दहावीपर्यंत मॉडेल इंग्लिश स्कुल, माजलगाव येथे शिक्षण पूर्ण केले तर बारावीचे शिक्षण लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव येथे पुर्ण केले.हे यश मिळाल्याने तिचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे तर पुढील यशस्वी वाटचाली करीता सुधाकर देशमानेसर, डॉ. स्वराज देशमाने व कुटुंबियांकडून शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला.

### सातव्या वेतन आयोगाचा ५ वा हप्ता देण्यात यावा: नगर परिषद कर्मचाऱ्यांचे उपोषण



**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील नगर परिषदेतील सर्व कर्मचारी सातव्या वेतन आयोगाचा पाचवा हप्ता तात्काळ मंजूर करण्यात यावा, या मागणीसाठी दिनांक २८ ऑगस्ट रोजी नगर परिषद कार्यालय माजलगाव येथे उपोषणास बसले आहेत. यापूर्वी दिनांक २१ ऑगस्ट रोजी नगर परिषद मुख्याधिकारी यांना याबाबत लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र वारंवार मागणी करूनही दखल न घेतल्यामुळे सर्व कर्मचारी वर्गामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या उपोषणात विशाल शिंदे, कैलाश भिसे, गोविंद साबळे, श्रावण ढगे, बन्सी वाघमारे, राम मिसाळ, एकनाथ टाकणखार, दिनकर कांबळे, चत्रभुज मिसाळ, आनंत वाघमारे, सय्यद आरेफ, सिकंदर खान, नसरूल्ला खाँ, रईसोद्दीन इब्राहीम, रावईबाई भोले, मालनबाई साळवे, केशरबाई साळवे, गंगुबाई डोंगरे, साळुबाई कांबळे, लक्ष्मीबाई वाल्मिकी, शोभाबाई वाल्मिकी, मिराबाई आलझेंडे, चंद्रकलाबाई जावळे, मिराबाई रांजवण, छायाबाई, रमेश भिसे, अक्षय गालफाडे, राजु वाल्मिकी, राजाभाऊ मिसाळ, संजय ससाणे, मळीबा ससाणे, अमोल टाकणखार, शाम राठोड, प्रकाश शिंदे, रंजित रोमन यांच्यासह इतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. आमची मागणी पूर्ण झाल्याशिवाय उपोषण मागे घेतले जाणार नाही, असा ठाम इशारा कर्मचाऱ्यांनी या वेळी दिला आहे .

### कुर्ला जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांकडून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती



**कुर्ला । प्रतिनिधी**

कुर्ला (ता. जि.बीड ) येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत मंगळवार, दि. २६ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार केल्या. शाळेच्या परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या उपक्रमाचे मार्गदर्शन जिल्हा परिषद कुर्ला शाळेची माजी विद्यार्थिनी कु. अश्विनी खोटे हिने केले. ► उर्वरित पान २ वर